लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

**Loksatta,** 3 August 2017

# येऊरच्या पाड्यांवर ‘अस्वच्छ’ ठाणे अभियान

## हागणदारीमुक्तीची घोषणा हवेतच; स्वच्छतागृहांची वानवा

**प्रतिनिधी, ठाणे**

**केंद्र सरकारच्या** स्वच्छ भारत अभियानाची पाळेमुळे ठाणे शहरातही खोलवर रुजावीत यासाठी गेल्या दोन वर्षापासून शहरभर स्वच्छ ठाणे अभियानाच्या भल्यामोठ्या मोहिमा राबविणाऱ्या ठाणे महापालिका आणि वन विभागाला येऊरच्या पाड्यांवर मात्र साधे स्वच्छतागृहदेखील उभे करता आलेलं नाही. महापालिकेतर्फे शौचालयासाठी निधी वितरित करण्यात येईल. असे आश्वासन देऊनही या भागातील अर्धेअधिक पाडे अजूनही स्वच्छतागृहाच्या प्रतीक्षेत आहेत.

‘घनदाट जंगलात नैसर्गिक विधीसाठी जाण्यास पर्याय नाही. पावसाळ्यात वाढलेल्या घनदाट जंगलात आडोसा शोधताना बिबट्या, जनावरांची भीती वाटते. महिलांना प्रातर्विधीसाठी भल्या पहाटेच काळोखात जंगलाची वाट धरावी लागत असल्याने जीव मुठीत घेऊन दररोज प्रवास करतो,’ अशा प्रतिक्रिया येथील आदिवासी पाड्यांमधील नागरिकांकडून व्यक्त होत आहेत.

काही महिन्यांपूर्वी ठाणे महानगरपालिकेच्या योजनेनुसार येऊरमधील आदिवासी पाड्यावर शौचालयबांधणीचा उपक्रम मोठ्या उत्साहात सुरू करण्यात आला. तब्बल पन्नास वर्षांपेक्षा अधिक काळ शौचालय सुविधेपासून वंचित असणाऱ्या येऊरच्या पाड्यावरील नागरिकांनी या योजनेला सकारात्मक प्रतिसाद देत घरोघरी शौचालयबांधणीसाठी पुढाकार घेतला. महापालिका योजनेच्या अंतर्गत शौचालयबांधणीसाठी प्रत्येक घरात चौदा हजार रुपये एवढा निधी देण्याचे महापालिका प्रशासनातर्फे सांगण्यात आले होते. पहिल्या टप्प्यात देण्यात आलेल्या सहा हजार एवढ्या रकमेत नागरिकांनी खड्डे खणण्याच्या सूचना महापालिकेतर्फे देण्यात आल्या होत्या. खड्डे खणल्यानंतर त्याचे छायाचित्र दाखवल्यास पुढील निधी देण्यात येईल, असे आश्वासन पालिकेतर्फे देण्यात आले, असे साधना गुरव यांनी सांगितले. मात्र याबाबत प्रशासनाला कळवले असता उर्वरित रक्कम देण्यासाठी निधी नसल्याचे सांगण्यात आल्याचे गुरव यांनी सांगितले. सहा हजार एवढी रक्कम मिळालेल्या काही घरांनी खड्डे खोदले आहेत. खणून ठेवलेले खड्डे या वर्षीच्या पावसात माती वाहून आल्याने बुजले असल्याचे पाड्यावर राहणारे प्रकाश कदम यांनी सांगितले.काही घरांना चौदा हजार निधीपैकी सहा हजार एवढा निधीदेखील पालिकेतर्फे देण्यात आलेला नाही.

> सध्या येऊरमधील पाड्यावर शंभरापेक्षा अधिक घरात शौचालय बांधणी पूर्ण झाली आहे. महापालिकेतर्फे लवकरात लवकर उर्वरित नागरिकांना निधी उपलब्ध झाल्यास पाड्यावरील नागरिकांची दैनंदिन समस्या दूर होईल.
>
> – अपूर्वा आगवान, क्रायसिस फाऊंडेशन

> शौचालयबांधणीसाठी ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक होते. येऊरमधील नागरिकांनी ही नोंदणी केली असली तरी त्यात काही तांत्रिक बाबींची पूर्तता होणे बाकी आहे. महिनाभरात निधी दिला जाईल.
>
> – बी.जी. खिलारे, घनकचरा व्यवस्थापन विभाग, ठाणे महानगरपालिका